# सूचनापत्रक

महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांमध्ये मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम ८८(५) आणि (६) व महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील कलम ८६, ८७, ८९ नुसार महाराष्ट्र राजयातील मालवाहतूक परवाना धारकांना गुजरात राज्याच्या प्रतिस्वाक्षरीसाठी एकुण खालील निर्देशिलेल्या उपलब्ध जागांसाठी शिफारस पत्रे द्यावयाची आहेत. त्यासाठी महाराष्ट्रातील इच्छूक परवाना धारकांकडून सचिव, राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे विहित नमुन्यात **दिनांक २१/१२/२०२१** पासून अर्ज मागविण्यात येत आहेत. उपलब्ध जागांच्या (१३६१) संख्येच्या अधीन राहून प्रथम येणाऱ्यास प्रथम पसंती (FIRST COME FIRST SERVE) या तत्वाचे पालन करुन प्रतिस्वाक्षरी परवान्यासाठी शिफारसपत्रे दिली जातील.

| प्रतिस्वाक्षरीसाठी शिफारस करावयाचे राज्य | प्रतिस्वाक्षरीसाठी कोटा | प्रतिस्वाक्षरीसाठी शिफारसपत्राकरिता एकुण उपलब्ध जागा |
|---|---|---|
| गुजरात | १३६१ | १३६१ |

**शिफारस पत्र मिळण्यासाठी नियम व अटी खालील प्रमाणे आहेत.**

१. प्रत्येक वाहनासाठी स्वतंत्रपणे अर्ज करावा.
२. अर्ज सादर करताना वाहनाची सर्व वैध कागदपत्रे तपासणीसाठी सादर करावी लागतील.
३. अर्जदाराने अर्जासोबत स्वत:चे छायाचित्र असलेल्या ओळखपत्राची छायांकित व साक्षांकित प्रत जोडावी.
४. गुजरात राज्याच्या प्रतिस्वाक्षरीसाठी परिवहन आयुक्त, गुजरात राज्य, सुरत यांच्या कार्यालयात एक वर्षाचा कर रु.५,५००/- इतका आगावू भरावा लागेल.
५. अर्जदाराने संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालय/ उप प्रादेशिक परिवहन कार्यालय यांच्याकडून परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नावाने गुजरात राज्याच्या प्रतिस्वाक्षरी मिळण्याबाबतचे शिफारसपत्र आणावे.

विहित नमुन्याचे अर्ज परिवहन आयुक्त कार्यालय व महाराष्ट्रातील सर्व प्रादेशिक/ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे कार्यालयाकडून मिळू शकतील. अर्जाचे शुल्क रु.०५/- इतके आहे.

पूर्णत: भरलेला अर्ज परिवहन आयुक्त कार्यालय, एमटीएनएल बिल्डिंग, फांउटन-२, ५ वा मजला, महात्मा गांधी रोड, हुतात्मा चौक, मुंबई ४०० ००१. येथे **दिनांक २१/१२/२०२१ पासुन** कार्यालयीन वेळेत **सकाळी १०.०० ते दुपारी १.००** वाजेपर्यंत अर्ज शुल्कासह प्रत्यक्ष सादर करावेत. टपालाव्दारे प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

विहित नमुन्यातील पूर्ण भरलेल्या आणि निर्देशित वेळेत प्राप्त झालेल्या अर्जांचाच प्रतिस्वाक्षरीच्या शिफारशीसाठी विचार केला जाईल. अपूर्ण व विनाशुल्क प्राप्त झालेले अर्ज नामंजूर केले जातील.

**सचिव**
**राज्य परिवहन प्राधिकरण**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

दुरध्वनी क्रमांक ०२२-२२६१४७२६
Email ID - dycommr.enf1@gmail.com
क्र.२२/कार्या.०५/प्र.स्वा.वि./२०२१/जा.क्र. 15017
**परिवहन आयुक्त कार्यालय,**
एमटीएनएल बिल्डिंग, फांउटन-२,
५ वा मजला, महात्मा गांधी रोड,
हुतात्मा चौक, मुंबई ४०० ००१.
दिनांक 14 DEC 2021

क्र. उप/प्र.प.का/................../प्रस्वाप/२०२१/जा.क्र.

दि.

प्रति,

**मा. परिवहन आयुक्त,**

**परिवहन आयुक्त कार्यालय,**

**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**विषय :-** महाराष्ट्र राज्यातील नोंदणीकृत मालवाहतूकपरवानाधारकांना **गुजरात** राज्यासाठी देण्यात येणाऱ्या **नवीन प्रतिस्वाक्षरी** परवान्यासाठी शिफारसपत्र देण्याबाबत.

**संदर्भ :-** आपले पत्र क्र/पआका/कार्यासन-५/गुप्रस्वाप/२२/२०२१/जा.क्र....१५०१६.., दि.१४/१२/२०२१

१) वाहन धारकाचे नाव व पत्ता ..............................................................................

..............................................................................

..............................................................................

२) मोटार वाहन क्रमांक ..............................................................................

३) परवाना क्रमांक ..............................................................................

४) परवान्याची वैधता ..............................................................................पर्यंत वैध आहे.

५) मोटार वाहन कर ..............................................................................पर्यंत भरणा केला आहे.

६) पर्यावरण कर ..............................................................................पर्यंत भरणा केला आहे.

७) व्यवसाय कराचा अभिप्राय ..............................................................................पर्यंत भरणा केला आहे.

८) विमा प्रमाणपत्राची वैधता ..............................................................................पर्यंत वैध आहे.

९) योग्यता प्रमाणपत्राची वैधता ..............................................................................पर्यंत वैध आहे.

१०) परवाना धारका विरुद्ध कार्यालयीन कार्यवाहीचे प्रकरण नोंदलेले आहे/नाही.

तरी उपरोक्त अर्जदारास गुजरात राज्यासाठी देण्यात येणाऱ्या नविन प्रतिस्वाक्षरी परवाना करण्याकरिता शिफारसपत्र देण्यात येत आहे.

**प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी**

......................................................

......................................................